| नाशिक महानगरपालिका,नाशिक<br>नाटयगृहे, तारांगण व फाळके स्मारक विभाग | |
|---|---|
| दुरध्वनी क्रमांक ०२५३-२५०२९३० | मुख्य कार्यालय:- मिळकत व्यवस्थापन विभाग, ३ मजला, राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक-४२२ ००२ |
| जा.क्र./कालिदास /232/२०२३ दि. १७/०८/२०२३ | NMC/DRT /OWL/२०२३/ 21४ |

# आदेश - ०४

विषय - महाकवि कालिदास कलामंदिर/ कलामंदिरातील प्रॅक्टीस हॉल, विश्रामगृहे इत्यादी व महात्मा फुले कलादालन सुधारीत नियमावली -२०२३ व सु धारित दर लागु करण्यात येत आहे .

संदर्भ – १. महाकवि कालिदास कलामंदिर नियमावली १९८७.

२. महाकवि कालिदास कलामंदिर विश्रामगृह नियमावली जा.क्र/कालिदास/७१/२००१ दिनांक ३०/१०/२००१.

३. महाकवि कालिदास कलामंदिर प्रॅक्टीस हॉल नियमावली जा.क्र/कलामंदिर/७२/२००१ दिनांक ३०/१०/२००१.

४. मा. आयुक्त सो. यांचा आदेश क्रमांक जा.क्र/कालिदास/४३/२००२ दिनांक १४/०३/२००२.

५. महाकवि कालिदास कलामंदिर नियमावली दिनांक ०४/०४/२००२.

६. मा. आयुक्त सो यांचा आदेश क्रमांक जा.क्र/मिळकत/कक्ष-१/२९७९/२०१८ दिनांक ०९/१०/२०१८.

७. महाकवि कालिदास कलामंदि व महात्मा फुले कलादालन सुधारित नियमावली दिनांक २०/१०/२०१८.

८. मा. आयुक्त सो. यांचा आदेश क्रमांक जा.क्र/मिळकत/कक्ष-१/६२५/२०१९ दिनांक २०/०९/२०१९.

९. महाकवि कालिदास कलामंदिर व महात्मा फुले कलादालन सुधारित नियमावली जा.क्र/मिपवि/कक्ष-१/५५४/२०१९ दिनांक २८/०८/२०१९.

१०. मा. महासभा ठराव क्रमांक १९ दिनांक ०४/०५/२०२३.

११. मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ४७ दिनांक २१/०६/२०२३.

महाकवि कालिदास कलामंदिर हे नागरिकांच्या सोयीसाठी सन १९८७ मध्ये सुरु करण्यात आले होते. त्यानंतर जुलै २०१७ ते ऑगष्ट २०१७ मध्ये नाट्यगृह नुतनीकरणासाठी बंद करण्यात आलेले होते व नुतनीकरणाचे काम पुर्ण करण्यात आलेनंतर माहे ऑगष्ट २०१८ मध्ये कालिदास कलामंदिर जनते साठी पुनश्च: खुले करण्यात आलेले असुन विविध प्रकारचे कार्यक्रम सातत्याने होत आहेत. सद्यस्थितीत सदर सभागृहात एकुण ९४२ आसनापैकी मुख्य प्रेक्षागृहामध्ये ६८२, बाल्कनी मध्ये २४० आणि बालकक्षामध्ये २० आसने आहेत. तसेच कलामंदिरात संपुर्ण वातानुकुलित यंत्रणा कार्यान्वित असुन रंगमंचामागे १ व्ही.व्ही.आय.पी , १ व्ही.आय.पी व ४ मेकअप रूम आहेत. तसेच १ ल्या मजल्यावर ६ विश्रामगृहे असुन दुसऱ्या मजल्यावर ६ विश्रामगृह आहेत. कलामंदिराच्या पुर्वेस १ ल्या मजल्यावर प्रॅक्टीस हॉल व २ ऱ्या मजल्यावर मनपाने प्रति महिना र.रू ३०/- दराने भाडेतत्वावर दिलेले अखिल भारतीय नाट्यपरिषद, नाशिक शाखेचे कार्यालय आहे. प्रेक्षकांच्या सोयीसाठी कलामंदिरात २ उपहारगृह आहेत. अशा प्रकारे कलामंदिरात विविध सुविधा उपलब्ध असुन त्याचे वापराबाबत उपरोक्त संदर्भ क्रमांक १ ते ९ प्रमाणे वेळोवेळी नियमावली व भाडे आकारणी अंमलात आलेली असुन सद्यसितीत संदर्भ क्रमांक ९ प्रमाणे नियमावली अस्तित्वात आहे. तथापी सदर नियमावलीत प्रत्यक्ष वापरात येणाऱ्या अडचणीनुसार काही बदल करणे आवश्यक असुन खालीलप्रमाणे नवीन नियमावली प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ ते ९ सर्व आदेश/नियम अधिक्रमित करून महाकवी कालीदास कलामंदीर/प्रॅक्टीस हॉल/विश्रामगृह /महात्मा फुले कलादालन याचे वापरणे साठीचे सुधारीत नियमावली, भाडे /अनामत आकारणी खालील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे असेल.

१. कालिदास कलामंदिर मधील विविध कार्यक्रमाचे भाडे/ अनामत आकारणी खालीलप्रमाणे राहील.

| अ. क्र. | कार्यक्रमाची वर्गवारी | प्रस्तावीत दर व वेळ | प्रस्तावीत दर व वेळ | प्रस्तावीत दर व वेळ | प्रस्तावीत दर व वेळ | सुरक्षा अनामत |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सकाळ ८.०० ते ११.०० | दुपार १२.०० ते ४.०० | सायंकाळ ४.३० ते ८.३० | रात्रौ. ९.३० ते ०१.०० | |
| १. | रंगीत तालिम / हौशी बालनाटय/ हौशी नाटक/कार्यक्रमाची तयारी | ४,५००/- + ८१०/- (व. व से.कर) | ५,५००/- + ९९०/- (व. व से.कर) | ७,०००/- + १२६०/- (व. व से.कर) | ९,०००/- + १६२०/- (व. व से.कर) | १०,०००/- |
| २. | व्यावसायिक नाटक/शास्त्रीय गायन / मराठी गाण्यांचा कार्यक्रम/ जादूचे प्रयोग/ व्यावसायिक बालनाटय /शास्त्रीय नृत्य | ८,५००/- + १५३०/- (व. व से.कर) | ११,०००/- + १९८०/- (व. व से.कर) | १३,०००/- + २३४०/- (व. व से.कर) | १५,०००/- + २७००/- (व. व से.कर) | २०,०००/- |
| ३. | ऑर्केस्ट्रा, कार्यशाळा, गजल, कविसंमेलन, व वरील क्र.१ व २ मध्ये समाविष्ट नसलेले अन्य कार्यक्रम/ व्याख्यान | १५,०००/- + २७००/- (व. व से.कर) | २१,०००/- + ३,७८०/- (व. व से.कर) | २४,०००/- + ४,३२०/- (व. व से.कर) | २६,०००/- +४,८६०/- (व. व से.कर) | ३०,०००/- |
| ४. | शासनाचे विविध विभागांतील बैठका/चर्चा/ सेमिनार/एकांकिका/नाट्य स्पर्धा | ४,५००/- + ८१०/- (व. व से.कर) | ५,५००/- + ९९०/- (व. व से.कर) | ७,०००/- + १,२६०/- (व. व से.कर) | ९,०००/- + १,६२०/- (व. व से.कर) | १०,०००/- |
| ४. ब | शासकीय कार्यक्रम/शासकीय कार्यशाळा/निवडणुक प्रशिक्षण वर्ग इत्यादी. | ४,५००/- + ८१०/- (व. व से.कर) | ५,५००/- + ९९०/- (व. व से.कर) | ७,०००/- + १,२६०/- (व. व से.कर) | ९,०००/- + १,६२०/- (व. व से.कर | १०,०००/- |
| ५. | शासनाचे विविध विभागांचे नाटक, स्पर्धा व इतर नाटक/ शास्त्रीय गायन / मराठी गाण्यांचा कार्यक्रम व कार्यशाळा. | ६,१२५/- + ११०३/- (व. व से.कर) | ८,०००/- + १,४४०/- (व. व से.कर) | ९,५००/- + १,७१०/- (व. व से.कर) | ११,०००/- + १९८०/- (व. व से.कर) | २०,०००/- |
| ६. | शासनाच्या विविध विभागाचे ऑर्केस्ट्रा, गजल व वरील क्र.१ व २ मध्ये समाविष्ट नसलेले अन्य कार्यक्रम | ११,०००/- + १,९८०/- (व. व से.कर) | १५,५००/- + २,७९०/- (व. व से.कर) | १७,७५०/- + ३,१९५/- (व. व से.कर) | १९,२५०/- + ३,४६५/- (व. व से.कर) | ३०,०००/- |

**२.** वरील दरांव्यतिरिक्त सुट्टीच्या दिवसांसाठी खालीलप्रमाणे अतिरिक्त शुल्क आकारणेत येईल.

व्यावसायीक नाटकासाठी मागणी नुसार अर्ध्या तास अगोदर व नाटक संपल्यानंतर अर्ध्या तास सवलत अनुज्ञेय राहील. तसेच व्ही.व्ही.आय.पी कक्षसाठी नियमानुसार चार्जेस घेतले जातील.

२.१- शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवसांसाठी वरील भाड्याव्यतिरिक्त अ.क्र १ करिता र. रू २०००/- आणि अ.क्र २ व ३ करिता र.रू २,५००/- अतिरिक्त शुल्क आकारले जाईल. मात्र सर्व प्रकारचे नाटकांना अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नाही.

**३. कलामंदिर मधील कार्यक्रमाचे भाडे व्यतिरिक्त इतर सुविधांचे भाडे आकारणी तक्ता**

| अ.क्र | जादा दर तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १. | व्हि.व्हि.आय.पी.कक्ष | १,०००/- |
| २. | विश्रामगृह- वातानुकुलीत कक्ष(२४ तासासाठी) | ८००/- |
| ३. | विश्रामगृह साधा कक्ष (२४ तासासाठी) | ५००/- |

**४. कालिदास कलामंदिरचे प्रॅक्टीस हॉलमधील विविध कार्यक्रमाचे भाडे/ अनामत आकारणी खालीलप्रमाणे राहील.**

| अ.क्र | तपशिल | सुधारीत दर | सुरक्षा अनामत |
|---|---|---|---|
| १. | तालीमसाठी (सकाळी ९ ते १), ( दुपारी १ ते ५), (सायं ५ ते ९) या वेळेत प्रतिसत्र | ५००/- + ५४/- (व. जिएसटी) | १,०००/- |
| २. | मर्या.प्रेक्षकांसाठी कार्यक्रम (सकाळी ९ ते १), (दुपारी १ ते ५), (सायं ५ ते ९) या वेळेत प्रतिसत्र | १,०००/- + १८०/- (व. जिएसटी) | १,०००/- |
| ३. | प्रदर्शनासाठी (स.९.०० ते रात्री ९.००) | ५,०००/- + ९००/- (व. जिएसटी) | ५,०००/- |
| ४. | व्यावसायिक प्रदर्शनासाठी (स.९.०० ते रात्री ९.००) | १०,०००/- + १,८००/- (व. जिएसटी) | ५,०००/- |

**५.महात्मा फुले कलादालन मधील विविध कार्यक्रमाचे भाडे/ अनामत आकारणी खालीलप्रमाणे राहील.**

| अ.क्र. | तपशील | भाडे रक्कम | अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| | **खालचा मजला** | | |
| १. | कला प्रदर्शन (सकाळी ९.०० ते रात्री ९.००) | १०,०००/- + १८००/- (व. जिएसटी) | १०,००० |
| २. | चर्चासत्र/ व्याख्यानमाला (सकाळी ९.०० ते रात्री ९.००) | ५,०००/- + ९००/- (व. जिएसटी) | ५,००० |
| ३. | तयारीसाठी (सकाळी ६.०० ते सकाळी ९.००) | १,०००/- + १८०/- (व. जिएसटी) | निरंक |
| ४. | तयारी / साहित्य ठेवण्यासाठी (रात्री ९.०० ते सकाळी ९.०० पर्यंत) | २,५००/- + ४५०/- (व. जिएसटी) | निरंक |
| | **वरचा मजला** | | |
| १. | चित्रशिल्प् / कला प्रदर्शन (सकाळी ९.०० ते रात्री ९.००) | १०,००० + १८००/- (व. जिएसटी) | १०,००० |
| २. | चर्चासत्र/ व्याख्यानमाला (सकाळी ९.०० ते रात्री ९.००) | ५,०००/- + ९००/- (व. व से.कर) | ५,००० |
| ३. | तयारीसाठी / साहित्य ठेवण्यासाठी (रात्री ९.०० ते सकाळी ९.०० पर्यंत) | २,५००/- + ४५०/- (व. जिएसटी) | निरंक |
| ४. | प्रोजेक्टर प्रति दिन | ३,०००/- + ५४०/- (व. जिएसटी) | निरंक |

शासकीय कार्यक्रमास २५% सवलत मा. आयुक्त सो यांचे मान्यतेने देण्यात येईल.

**६. महाकवि कालीदास कलामंदीरातील कार्यक्रमांसाठी सत्र कालावधी खालीलप्रमाणे राहील-**

| अ.क्र. | सत्राचा तपशिल | सत्राची वेळ |
|---|---|---|
| १. | पहिले सत्र | सकाळी ८.०० ते ११:०० |
| २. | दुसरे सत्र | दुपारी १२:०० ते ४:०० |
| ३. | तिसरे सत्र | सायं. ४:३० ते रात्रौ ८:३० |
| ४. | चौथे सत्र | रात्रौ. ९ :३० ते रात्रौ १:00 |

**दिलेल्या सत्राची वेळ यामध्ये कार्यक्रम चालू करण्याची पुर्व तयारी व कार्यक्रम संपल्यानंतर रंगमंच रिकामे करून देण्याची वेळ समाविष्ट करणेत आलेली आहे त्यामुळे कार्यक्रमाचे वेळेपुर्वी व कार्यक्रम संपल्यानंतर उपरोक्त वेळेव्यतिरिक्त अतिरिक्त वेळेची मागणी करू नये. कार्यक्रम, त्याची पुर्व तयारी व कार्यक्रम संपल्यानंतर रंगमंच रिकामे करण्याकरीता लागणारी वेळ गृहीत धरून सत्रांचे आरक्षण करावे. गरज पडल्यास एकापेक्षा जास्त सत्रांचे आरक्षण करावे.**

**७. कलामंदिर आगाऊ आरक्षणाचा कालावधी खालील प्रमाणे असेल.त्यानंतर उपलब्धते प्रमाणे उर्वरित आरक्षण होईल.**

| अ.क्र | तपशिल | आरक्षण चालू करण्याचा दिवस |
|---|---|---|
| १. | एप्रिल ते जुन मधील आगाऊ आरक्षण | १ जानेवारी. |
| २. | जुलै ते सप्टेंबर मधील आगाऊ आरक्षण | १ एप्रिल |
| ३. | ऑक्टों ते डिसेंबर मधील आगाऊ आरक्षण | १ जुलै |
| ४. | जानेवारी ते मार्च मधील आगाऊ आरक्षण | १ ऑक्टोंबर |

**८. पुर्व आरक्षित आरक्षण रद्द झाल्यास खालीलप्रमाणे भाडे व अनामत परतावा करण्यात येईल.**

| अ. क्र | परतावा कालावधीचा तपशिल | भाडे परतावा रक्कम टक्केवारी | अनामत |
|---|---|---|---|
| १. | कार्यक्रमापुर्वी ३० दिवस अथवा त्यापेक्षा कमी कालावधी मध्ये आरक्षण रद्द केल्यास | निरंक | अनामत रक्कम पुर्ण परत केली जाईल. |
| २. | कार्यक्रमापुर्वी ३१ दिवस ते ६० दिवसांपर्यंत कालावधी मध्ये आरक्षण रद्द केल्यास | ५०% | |
| ३. | कार्यक्रमापुर्वी ६१ दिवस ते ९० दिवसांपर्यंत कालावधी मध्ये आरक्षण रद्द केल्यास | ७५% | |
| ४. | कार्यक्रमापुर्वी ९१ दिवस व त्यापेक्षा जास्त कालावधी मध्ये आरक्षण रद्द केल्यास | १००% | |
| ५. | आरक्षण रद्द चा कालावधी हा पुर्ण दिवसात व दिवसाची सुरुवात ही रात्री १२.०० वाजता धरली जाईल. | | |

९. महाकवी कालीदास कलामंदीरातील ९४२ आसनांपैकी मुख्यप्रेक्षागृहामध्ये ६८२, बाल्कनीमध्ये २४० आणि बालकक्षामध्ये २० आसने आहेत. मुख्यप्रेक्षागृहातील रांग क्र.१ (A) मधील आसन क्र.६ व ७ रंगभूमी परिनिरीक्षण मंडळ सदस्यांसाठी आणि आसन क्र.८ ते १३ व रांग क्र.५ मध्ये ११ ते १६ महानगरपालिकेसाठी कायमस्वरुपी राखीव ठेवण्यात येतील. कुठल्याही परिस्थितीत सदर राखीव असणाऱ्या तिकीटांची विक्री करता येणार नाही. उर्वरित ९२८ आसने तिकीट विक्रीकरीता उपलब्ध राहतील. राखीव आसन प्रवेशिकांचे वाटप उप आयुक्त, मिळकत / प्रशासन यांचे मार्फत करण्यात येईल

१०.सदर आदेशान्वये महाकवी कालीदास कलामंदीर व महात्मा फुले कलादालन कार्यक्रमांकरीता उपलब्ध करुन देण्यात येईल. तथापि,राजकीय पक्षांचा मेळावा, लावणी, फॅन्सी ड्रेस स्पर्धा, सौदर्य स्पर्धा शालेय/महाविदयालयीन / स्नेहसंमेलन/ बॉडी बिल्डींग स्पर्धा , मेलडी क्वीन/मेलडी किंग स्पर्धा या सारख्या प्रकारच्या कार्यक्रमासाठी कलामंदीर व कलादालन दिले जाणार नाही.

११. कालिदास कलामंदीरा करीता लागू करण्यातआलेल्या भाडयामध्ये रंगमंचावरील साहीत्य,माईकव्यवस्था, लाईट इत्यादी मोफत दिले जाईल. तथापि सदर साहित्य, सुविधा इत्यादी. कुठल्याही कारणास्तव उपलब्ध करुन देणे शक्य न झाल्यास भाड्यात कुठल्याही प्रकारची सवलत दिली जाणार नाही.

१२. कालिदास कलामंदिर नियमावलीत दिलेल्या वेळेतच उपलब्ध करुन दिले जाईल. ठरवून दिलेल्या वेळेत प्रयोग संपविण्याची जबाबदारी अर्जदारांची राहील. वेळ संपल्यानंतर ३० मिनिटास र.रु.१०००/- याप्रमाणे जादा आकार भरावा लागेल.

१३. अर्जदाराने कार्यक्रम करीता आरक्षीत अनामत रक्कम व संपूर्ण भाडे भरणे बंधनकारक असेल.ऑफलाईन बुकींग करतांना अनामतीसाठी अनामत रक्कमेचा धनादेश कार्यक्रमाचे तारखेचा व नाशिक मनपाच्या नावाने द्यावा लागेल. तो धनादेश बँकेत जमा न करता व्यवस्थापनाच्या ताब्यात ठेवला जाईल. जादा वुसली अर्जदाराने तीन दिवसाच्या आत रोख स्वरुपात भरल्येस सदर धनादेश परत करण्यात येईल.अन्यथा चौथ्या दिवशी सदर धनादेश मनपाच्या खात्यात जमा केला जाईल.ज्या संस्थेच्या/व्यक्तिच्या नावाने आरक्षण असेल त्या संस्थेचा/व्यक्तिचा चेक अनामत म्हणून स्विकारला जाईल तसेच सदर चेक हा आरक्षणाची तारखेचाअसणे गरजेचे आहे.

१४. कुठल्याही व्यक्तीने/ संस्थेने केलेले आरक्षण मनपाचे विभाग प्रमुखांच्या परवानगी शिवाय परस्पर अन्य व्यक्तीस / संस्थेस आरक्षण देता येणार नाही.तसे अढळल्यास रु.२५,००० /- दंड आकारणेत येईल व अशा व्यक्तीस / संस्थेस तदनंतर कधीही आरक्षण दिले जाणार नाही.

१५. प्रयोगापूर्वी चार दिवस आधी सकाळी ९.०० ते १२.०० व दुपारी ५.०० ते ८.०० आणि प्रयोगाच्या दिवशी पूर्ण दिवस तिकीट विक्री करता येईल. तिकीट विक्रीचे काम नियमानुसार सुरु आहे किंवा कसे हे पाहण्याच्या अधिकार महापालिका प्रशासनास / व्यवस्थापनास राहील. त्यांनी वेळोवेळी केलेल्या सुचना अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.तसेच आरक्षण नसल्यास बुकींग ऑफीसचा गैरवापर होता कामा नये.

१६. तिकीटविक्री पूर्वी रंगभूमी परिनिरीक्षण मंडळाचे व नाशिक महानगरपालिकेचे राखीव आसने / तिकीटे व्यवस्थापकाकडे जमा करावीत.

१७. प्रयोगासंदर्भात सर्व कामगार कायदे व शासकीय नियमांचे पालन करणेची जबाबदारी आयोजकांवर राहील. कार्यक्रम सुरु होण्यापूर्वी कार्यालयात पोलीस विभागाकडील परफॉरमन्स व ध्वनिक्षेपक परवाना, रंगभूमी परिनिरीक्षण मंडळ प्रमाणपत्र,इतर आवश्यक असलेली शासकीय प्रमाणपत्रे इत्यादी परवाने दाखविणे सक्तीचे आहे.

१८. सुरक्षेची व्यवस्था आयोजकाने स्व खर्चाने करणे आवश्यक आहे. तथापि तातडीच्या प्रसंगी व्यवस्थापनास पोलीस मदत मागविण्याची गरज पडल्यास, त्याचा संपूर्ण खर्च आयोजकास दयावा लागेल. प्रयोगाच्या वेळेस आयोजकाने आपल्याकडील व्दारपाल स्व खर्चाने ठेवावे.

१९. आयोजकास प्रयोगाचे कालावधीत रंगमंच व रंगपट वापरता येईल. तथापि, प्रयोगाच्या वेळी संबंधित व्यक्तीशिवाय अन्य व्यक्तिंना प्रवेश दिला जाणार नाही.

२०. प्रयोग कालावधीत महापालिकेने प्राधिकृत केलेले अधिकारी अगर व्यवस्थापक संपुर्ण कलामंदिराची तपासणी करु शकतील.

२१. प्रयोग कालावधीत संपुर्ण परिसरात थुंकणे / धुम्रपान करणे / मद्यपान करणे अथवा प्रेक्षागृहात खाद्यपदार्थ, पाण्याच्या / शितपेयाच्या बाटल्या नेण्यास मज्जाव राहील. हयाची जबाबदारी व्दारपाल व पर्यायाने आयोजकावर राहील . तसेच आक्षेपार्ह वर्तन करणाऱ्या प्रेक्षकास प्रेक्षागृहाबाहेर काढण्याचा अधिकार महापालिका प्रशासनास राहील.

२२. परस्पर कार्यक्रम दुसाऱ्या संस्थेस दिल्यास अथवा Booking केलेल्या एखाद्याने अतिरिक्त शुल्क घेऊन कार्यक्रम दिल्यास त्यास Black list केले जाईल.

२३. महाकवी कालीदास कलामंदीर/महात्मा फुले कलादालन/ प्रॅक्टीस हॉलच्या भाडयामध्ये कुठल्याही प्रकारची सवलत दिली जाणार नाही व तशी मागणी करू नये.

२४. आयुक्त् सो. यांचे मान्यतेने काही अपरिहार्य कारणास्तवआरक्षीत तारीख/ सत्र रद्द करणेचा, तसेच शासकीय अथवा मनपा कार्यक्रमासाठी खाजगी व्यक्ती/ संस्थेस दिलेले आरक्षण रद्द करणेचा अधिकार महापालिका प्रशासनास राहील.

२५. वेळेवर उद्भववनारी तांत्रिक आपत्ती व नैसर्गिक आपत्ती अथवा कलामंदीरातील तांत्रिक बिघाडामूळे प्रयोग रदद झाल्यास कार्यक्रमाचे भाडे व अनामत पुढील प्रयोगात समायोजित केले जाईल. तथापि, आयोजकांनी कुठल्याही कारणाने प्रयोग रद्द झाल्यास अथवा कार्यक्रम पुढे ढकलल्यास/तारीख बदलुन मागीतल्यास भरलेले भाडे रक्कम परत करण्यात येणार नाही अथवा समायोजित केले जाणार नाही मात्र अनामत रक्कम पुर्ण परत करण्यात येईल. तसेच शासकीय विभागाने शासकीय कार्यक्रमासाठी आरक्षण केलेले असल्यास व तो कार्यक्रम काही अपरिहार्य कारणास्तव रद्द झाल्यास कलामंदिराच्या उपलब्धते प्रमाणे आयोजकांना आरक्षण उपलब्ध करून दिले जाईल व रद्द झालेल्या सत्राचे अनामत व भाडे उपलब्ध करून दिलेल्या सत्राचे दिवशी समायोजित करण्यात येईल. तथापि समायोजित केलेली रक्कम कमी भरल्यास उर्वरित रक्कम आयोजकांना भरणे बंधनकारक राहील.

२६. कालिदास कलामंदीर परिसरात कोणत्याही प्रकारे राजकीय पक्षाचे फलक/ स्ट्रिकर्स/ पताका/ झेंडे लावू अथवा चिटकवू नये. कलामंदीर/ कलादालन येथील साहीत्य महापालिका प्रशासनाचे परवानगी शिवाय बाहेर नेता येणार नाही.

२७. कलामंदीर/ कलादालन/ हॉल/ विश्रामगृह सशुल्क उपलब्ध करुन देणे अथवा नाकारणे या बाबतचे सर्व अधिकार महापालिका आयुक्तांना आहेत. त्याचप्रमाणे ऑनलाईन/ऑफलाईन अर्जामध्ये दिलेली माहिती खोटी असल्याचे सिध्द झाल्यास आरक्षण रद्द करण्याचा व संबंधितास काळ्या यादीत टाकण्याचा अधिकार महापालिका प्रशासनास राहील.

२८. महाकवी कालीदास कलामंदीर किंवा महात्मा फुले कलादालनाचा कार्यक्रमासाठी वापर झाले नंतर ते स्वच्छ व सुस्थितीत नसेल तर दंड र.रु.२०००/- आकारण्यात येईल.

२९. महाकवी कालीदास कलामंदीर किंवा महात्मा फुले कलादालनाच्या भिंतीवर, फरशीवर लिहीणे/चिटकवणे अन्यथा कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याबाबत आर्थिक नुकसान भरपाईची रक्कम अनामत रकमेतुन वसुल करण्यात येईल. तसेच नुकसानीची रक्कम अनामत रकमेपेक्षा जास्त झाल्यास ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये प्राप्त अधिकारानुसार वसुल करणेचा अधिकार मनपास राहील.

३०.आयोजित केलेल्या कार्यक्रमासाठी आणलेल्या मौल्यवान वस्तु/वाहन इ.बाबीची सुरक्षेतेची जबाबदारी आयोजकांची/ प्रेक्षकांची राहील त्यास व्यवस्थापन अथवा मनपा प्रशासन कुठल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

३१. महाकवी कालीदास कलामंदीर मधील प्रॅक्टीस हॉल मधील प्रदर्शन व कार्यक्रमासाठी कालावधी सकाळी ९.०० ते रात्रौ ९.०० पर्यंतच राहील व प्रॅक्टीस हॉल मधील कार्यक्रमाचा कुठल्याही प्रकारचा त्रास अथवा अडचण मुख्य कलामंदिरातील कार्यक्रमाला होणार नाही याची आयेजकांना दक्षता घ्यावी लागेल.

३२. कालिदास कलामंदर व महात्मा फुले कलादालन येथे कुठल्याही सबबीवर जेवण बनविण्यासाठी / खाद्य पदार्थ गरम करण्यासाठी परवानगी दिली जाणार नाही.

३३. या नियमाच्या अर्थाबाबत अगर वापरांबाबत कोणत्याही बाबतीत अर्जदार व महापालिका प्रशासन यांच्यात मतभेद झाल्यास त्यासंबंधी महापालिका आयुक्तांचा निर्णय अंतिम राहील.तसेच सदरची नियमावली हि आदेशाचे दिनांकापासुन लागु राहील.

३४. सर्व प्रकारच्या भाडे आकारणी वरील वस्तु व सेवा कर शासनाच्या वेळोवेळीच्या प्रचलित दराप्रमाणे आकारण्यात येईल.

३५. नियमित भाड्यात दर वर्षी भाडेवाढ करणेचा अधिकार प्रशासनास राहील.

३६. सदरच्या नियमात भर टाकणे अगर बदलणे यासाठी कोणतीही पुर्व सुचना न देता नियमात भर टाकणे अगर बदलणेचा अधिकार महानगरपालिका आयुक्तांना आहे.

३७. कालिदास कलामंदिर/कलादालन/ प्रॅक्टीस हॉल येथे कोणत्याही कार्यक्रमास जेवणाची तयारी, जेवण बनविणे, जेवन देणे अनुज्ञेय नाही.

३८. १००%शासकीय विभागाचा व शासकीय कार्यक्रम अपवादात्मक परिस्थितीत कालिदास कलामंदिर इमारतीच्य पश्चिमेकडील मोकळ्या जागेत मा. आयुक्त सो. यांच्य मान्यतेने जेवणाची व स्टॉल लावण्याची परवानगी देण्यात येईल. सदर नियमावलीची अंमलबजावणी आदेशाच्य तारखेपासुन करण्यात येईल.

सबब महाकवि कालिदार कलामंदिर/कलामंदिरातील प्रॅक्टीस हॉल/विश्रामगृहे इत्यादी व महात्मा फुले कलादालनाचे उपरोक्त प्रमाणे सुधारित नविन प्रस्तावित नियमावली व भाडे आकारणी करणेस उपरोक्त संदर्भ क्रमांक १० व ११ मधील पारित झालेल्या ठरावान्वये मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार सुधारित नियमावली व दर लागु करण्यात येत आहे.

सदर आदेश मनपाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करणे तसेच ऑनलाईन आरक्षण कार्यप्रणालीमध्ये आदेशाप्रमाणे त्वरीत बदल करणेची जबाबदारी माहिती व तंत्रज्ञान विभागाची राहील.

आयुक्त तथा प्रशासक
नाशिक महानगरपालिका नाशिक

प्रत -

१. उपआयुक्त (मळकत), नाशिक मनपा.
२. संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग
३. व्यवस्थापक, महाकवि कालिदास कलामंदिर.